2 9 DEC 2022

तरूण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# नवीन शैक्षणिक धोरणाची अंमलबजावणी सुकर



अहिल्या परकाळे
कोल्हापूर

केंद्र सरकारने कौशल्यावर आधारीत विद्यार्थी हिताचे नवीन शैक्षणिक धोरण तयार केले आहे. या धोरणाची अंमलबजावणी करण्याच्या सुचना देशभरातील विद्यापीठांना केल्या आहेत. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने विद्यार्थी केंद्रबिंदू मानून पदवी प्रथम वर्षापासून नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात केली आहे. शिवाजी विद्यापीठ संशोधनाला प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालय, अधिविभाग विद्यार्थी, प्राध्यापक, कर्मचाऱ्यांना स्वनिधीतून प्रोत्साहनपर अनुदान देते. परिणामी विद्यापीठातील ३४ प्राध्यापकांनी जागतिक क्रमवारीत विद्यापीठाचे नाव सुवर्णाक्षरांनी कोरले आहे. विद्यापीठाचे हे पाऊल नवीन शैक्षणिक धोरणाच्या अनुषंगाने महत्वाचे मानले जाते. त्यामुळे नवीन शैक्षणिक धोरणाची आव्हाने पेलणे शिवाजी विद्यापीठाला सुकर झाले आहे.

शिवाजी विद्यापीठाने नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीच्या दृष्टीने अभ्यासक्रमांची अनुकुल रचना केली आहे. प्रवेश घेण्याची क्षमता वाढवली असून स्वतंत्र स्किल बेस्ड अभ्यासक्रम राबवत, अभ्यासक्रम निवडण्याची मुभा विद्यार्थ्यांना दिली आहे. तसेच गेल्या दहा वर्षापासून चॉईस बेस्ड क्रेडीट सिस्टिम अंतर्गत दुसऱ्या शाखेच्या अभ्यासक्रमाचे शिक्षण दिले जातेय. ही सुविधा विद्यापीठ व महाविद्यालयात उपलब्ध करून दिली आहे. विज्ञानाचा प्रसार करण्यासाठी स्तुती उपक्रम सुरु केला आहे. वनस्पतीपासून अर्क काढण्याची अद्यावत यंत्रणा उपलब्ध आहे. अत्याधुनिक क्रीडा सुविधा दिल्या असून, परदेशात स्पर्धेसाठी जाणाऱ्या खेळाडूंना ५० हजार अर्थसहाय्य केले जाते. याचा खेळाडूंवर सकारात्मक परिणाम झाला असून, सध्या जम्मू विद्यापीठ, जबलपूर मध्यप्रदेश येथे सुरू असलेल्या पश्चिम विभागीय आंतरविद्यापीठ स्पर्धेत शिवाजी विद्यापीठाच्या खेळाडूंनी भरभरून यश संपादन करीत विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.



- शिवाजी विद्यापीठाने केली पदवी प्रथम वर्षापासून सुरुवात
- केंद्र सरकारच्या नियमांची पूर्तता

स्टार्टअपच्या माध्यमातून संशोधन आणि त्यावर प्रक्रिया करून लस्सी, कॅफेनयुक्त कॉफी, शिवतेज तेल असे काही उत्पादने बाजारात विक्री होतेय. तसेच सेक्शन–८ कंपनीच्या माध्यमातून नवीन उद्योगांना प्रोत्साहन दिले जातेय.

**तरुण भारत** विशेष वृत्त

याचबरोबर मागील ११ वर्षापासून विद्यापीठ केंद्र व राज्य शासनाच्या सर्वेक्षणात अत्युच्च कामगिरी बजावत आहे. शिवाजी विद्यापीठाने पीएच. डी. साठी सॉफ्टवेअर विकसित केले आहे. महाविद्यालयीन शिक्षक, प्रशासकीय कर्मचाऱ्यांचा संपूर्ण डेटा ऑनलाईन स्वरुपात विद्यापीठाकडे उपलब्ध आहे. एवढेच नाही तर महाविद्यालय ऑडीटही ऑनलाईन केले असून त्याचे मूल्यांकनही ऑनलाईन केले जाणार आहे. निवडणूक मतदान यादीसुद्धा ऑनलाईन प्रसिध्द केल्याने संपूर्ण संगणकीकरण झाले म्हंटले तरी वावगे ठरणार नाही. परिसरातील जैवविविधता विद्यापीठाच्या यशात महत्वाचा भाग ठरतेय. विद्यापीठातील १० विहरी, १२ तळयांच्या माध्यमातून केलेले स्वतंत्र पाणी व्यवस्थापनाने राज्यासमोर आदर्श घालून दिला आहे.

### नवीन वर्षात विद्यापीठ शंभर टक्के कॅशलेस

ऑनलाईनच्या माध्यमातून गेटवे पेमेंट, ऑनलाईन प्रवेश, परीक्षा आणि पदवीदान अर्जही भरला जातोय. तसेच परीक्षा विभागाने स्वतःची एस. आर. पी.डी. तयार केली असून या माध्यमातून ऑनलाईन प्रश्नपत्रिका महाविद्यालयांना पाठवली जाते. तसेच ३० दिवसाच्या आत परीक्षेचा निकालही जाहीर केला जाईल. त्यामुळे १ जानेवारीपासून शिवाजी विद्यापीठ शंभर टक्के कॅशलेस होणार आहे.

### विद्यापीठातील कौशल्याधिष्ठीत कार्यक्रम

पी. जी. डिप्लोमा इन इंडस्ट्रियल सेफ्टी, हॉटेल मॅनेजमेंट इन्स्टिट्युट, वास्तुशास्त्र, औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालय, साखर कारखान्याजवळ इन्स्टिट्युट फॉर शुगर ॲण्ड अलाईड प्रोडक्टस् टेक्नॉलॉजी इन्स्टिट्युट, संलग्न महाविद्यालयात गरजेनुसार खादी प्रोडक्शन व डिझाईन अभ्यासक्रम, पर्यटनविषयी अभ्यासक्रम (ट्रॅव्हल–टुरिझम), रेशीमशास्त्र असे जवळपास २०० पेक्षा जास्त विषय कौशल्याधिष्ठीत आहेत. दूरशिक्षणला युजीसीची पाच वर्षाची मान्यता मिळाली आहे. दूरशिक्षणचा अभ्यासक्रम २०२३–२४ पासून ऑनलाईन पद्धतीने शिकवला जाणार आहे. 'लोककला संवर्धन' केंद्र स्थापन करून लोककलेचा वारसा पुढे नेण्याचे काम विद्यापीठ करीत आहे.

### नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणीला सुरुवात



नवीन शैक्षणिक धोरण विद्यार्थी केंद्रीत असल्याने त्याचा फायदा विद्यार्थ्यांना होणार आहे. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाकडून नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीला सुरुवात झाली आहे. शासनाच्या नियमानुसार अभ्यासक्रमात बदल करून, कौशल्यावर आधारीत अभ्यासक्रम तयार केले आहेत. नियमानुसार आवश्यक ते सर्व बदल केले असल्याने शिवाजी विद्यापीठ अंमलबजावणीसाठी पूर्णपणे सज्ज आहे.

**डॉ. पी. एस. पाटील (प्र–कुलगुरू, शिवाजी विद्यापीठ)**

तरुण भारत

# पन्हाळा पावनखिंड शिवपावन प्रेरणा मोहिमेचे उद्घाटन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर राष्ट्रीय सेवा योजना विभाग आणि विश्वास शिक्षण प्रसारक मंडळ संचलित चिखलीतील देशभक्त आनंदराव बळवंतराव नाईक आर्टस आणि सायन्स कॉलेज राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने पन्हाळा पावनखिंड शिवपावन प्रेरणा मोहीम–२०२२ चे आयोजन केले आहे. या मोहिमेचे उद्घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते झाले.

कोल्हापूर, सांगली आणि सातारा जिल्ह्यातील सर्व महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील १५० स्वंयसेवकांचा सहभाग आहे. गुरूवार २९ डिसेंबर रोजी पन्हाळा येथील शिवा काशीद पुतळा येथून सुरूवात होईल. ३० डिसेंबर रोजी हि मोहीम पांढरपाणीकडे मार्गक्रमण करेल. पांढरपाणी येथे जेवणानंतर पावनखिंडकडे जाताना छत्रपती शिवाजी महाराज यांची पालखी निघेल. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्या हस्ते समारोप होईल, अशी माहिती विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना संचालक अभय जायभाये यांनी दिली. पावनखिंड मोहिमेच्या उद्घाटनप्रसंगी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, चिखली येथील विश्वास शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष अमरसिंह नाईक, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील, पन्हाळा येथील संजीवन नॉलेज सिटीचे चेअरमन पी. आर. भोसले, सहसचिव एन. आर. भोसले आदी उपस्थित होते.

लोकमत

# विद्यापीठात शनिवारपासून ऑनलाइन रिसीट पोर्टल

## प्रभारी वित्त अजित चौगुले यांची माहिती

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सर्व अधिविभागप्रमुख, संचालक, समन्वयक, शिक्षक अधिकारी, प्रशासकीय सेवक, सर्व संलग्न महाविद्यालये, मान्यता प्राप्त संस्था, अधिविभागांतील विद्यार्थी आदींनी शिवाजी विद्यापीठाच्या ऑनलाइन रिसीट पोर्टलचा वापर करावा. शनिवार (दि. ३१ डिसेंबर) पासून पोर्टल वापरावे, असे आवाहन प्रभारी वित्त व लेखाधिकारी अजित चौगुले यांनी केले.

अधिकार मंडळांच्या ठरावानुसार विद्यापीठ परिसरामधील सर्व अधिविभागांद्वारे विद्यापीठाच्या जमास्वीकृती विभागात रोखीने, धनादेशाद्वारे, बँक जमा आदींच्या पावत्या शनिवारपासून बंद करण्यात येत आहेत. दि. ३१ जानेवारी २०२३ पासून महाविद्यालये व इतरांकरिता ही सुविधा बंद केली जाणार आहे. सर्व संबंधितांनी ऑनलाइन रिसीट पोर्टलचा वापर करून सर्व पावत्या ऑनलाइन करावयाच्या आहेत. ही सुविधा विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून दिली आहे.

सकाळ

# ऑनलाईन रिसीट पोर्टलचा वापर करण्याचे विद्यापीठाचे आवाहन



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात ३१ डिसेंबरपासून ऑनलाईन रिसीट पोर्टलचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. विद्यापीठ परिसरामधील सर्व अधिविभागांद्वारे विद्यापीठाच्या जमा स्वीकृती विभागात रोखीने, धनादेशाद्वारे, बँक जमा पावतीद्वारे केल्या जाणाऱ्या पावत्या ३१ डिसेंबर २०२२ पासून बंद करण्यात येत आहेत. तसेच ३१ जानेवारी २०२३ पासून महाविद्यालये व अन्य घटकांकरिता ही सुविधा बंद करण्यात येणार आहे. सर्व संबंधितांनी ऑनलाईन रिसीट पोर्टलचा वापर करून सर्व पावत्या ऑनलाईन करायच्या आहेत. ही सुविधा विद्यापीठाच्या www.unishivaji.ac.in या संकेतस्थळावर क्विक लिंक्समध्ये ऑनलाईन रिसीट पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहे.

पुण्यनगरी

# 'वारसा' लघुपटाचे आज सादरीकरण

**कोल्हापूर :** अत्यंत प्रतिष्ठेचा फिल्मफेअर पुरस्कार विजेते दिग्दर्शक सचिन सूर्यवंशी यांचा शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के यांच्या हस्ते गुरुवारी (दि. २९ डिसेंबर) विद्यापीठात सत्कार होणार आहे. हा कार्यक्रम अर्थशास्त्र अधिविभागाच्या सेमिनार हॉलमध्ये दुपारी पावणेचार वाजता होईल. सचिन सूर्यवंशी यावेळी पुरस्कारप्राप्त 'वारसा' हा लघुपट दाखवणार आहेत. शिवाय ते विद्यार्थी आणि उपस्थित प्रेक्षकांशी संवाद साधणार आहेत, अशी माहिती अध्यासनाचे समन्वयक डॉ. शिवाजी जाधव यांनी दिली. नुकताच 'वारसा' या लघुपटासाठी त्यांना २०२२ चा फिल्मफेअर पुरस्कार मिळालेला आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, शिवनेरी, रमेश कदम, हिरण्यकेशी विजयी

## मेजर यादव चषक टी-२० क्रिकेट

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठ, शिवनेरी स्पोर्टस्, रमेश कदम ॲकॅडमी व हिरण्यकेशी फाऊंडेशन संघांनी प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवून मेजर यादव चषक टी-२० क्रिकेट स्पर्धेत आघाडी मिळविली. जिल्हा क्रिकेट असो. आयोजित ही स्पर्धा कागलच्या छत्रपती शाहू मैदानावर सुरु आहे.

**हिरण्यकेशी संघाचा १४५ धावांनी विजय**

हिरण्यकैशी फाऊंडेशनने २० षटकांत ६ बाद २३० धावा केल्या. निखिल पाटीलने ८२, सागर मेतकेने ५४, चेतन सावरेने नाबाद २६ धावा केल्या. गडहिंग्लज तालुका संघाच्या सुनील जाधवने २ विकेट घेतल्या. उत्तरादाखल गडहिंग्लज संघ २० षटकांत ४ बाद ८५ धावा करू शकला. जितू माळवीने नाबाद ५२ धावा केल्या. हिरण्यकेशीकडून निखिल नवाळेने ३ विकेट घेतल्या.

**शिवाजी विद्यापीठाचा १८ धावांनी विजय**

शिवाजी विद्यापीठ कर्मचारी संघाने २० षटकांत ६ बाद १३६ धावा केल्या. प्रसाद देसाईनि नाबाद ४४, विक्रम कोंढावळेने ३० धावा केल्या. भिडे स्पोर्टस् 'क'कडून राहुल शिंदे व तौसिफ शेख यांनी प्रत्येकी २ विकेट घेतल्या. भिडे स्पोर्टस्चा संघ ११८ धावांत गुंडळला. कुमार जाधवने ३० धावा केल्या. शिवाजी विद्यापीठ कडून विनायक शिंदे व अजय आयरेकर यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या.

**शिवनेरी स्पोर्टसने १४३ धावानी विजय**

शिवनेरी स्पोर्टस्ने २० षटकांत ३ बाद २२३ धावा केल्या. श्रेयस पाटीलने ९२, अनुप माने नाबाद ६५ धावा केल्या. गोकुळकडून अनिल पाटीलने २ विकेटस् घेतल्या. उत्तरादाखल गोकुळचा संघ ८० धावांत गुंडाळला. शिवनेरी स्पोर्टस्च्या श्रेयस पाटील व हर्षवर्धन जाधव यांनी प्रत्येकी ३ विकेट्स घेतल्या.

**रमेश कदम ॲकॅडमी ९ विकेटनी विजयी**

विले पारळे संघाने ५२ धावा केल्या. अजय गौडाने २६ धावा केल्या. रमेश कदम ॲकॅडमीच्या तेज सोनुले व वसीम मुल्लाणी यांनी प्रत्येकी ३, रोहीत बिराजदारने २ विकेट घेतल्या. उत्तरादाखल रमेश कदम क्रिकेट संघाने १ बाद ५३ धावांसह विजय साजरा केला. दर्पण गुंदेशाने २३, नीलेश चव्हाणने नाबाद १३ व वसीम मुल्लाणीने नाबाद १० धावा केल्या.